www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१६ – अंक ४ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



केंद्र सरकारच्या नोटाबंदीच्या ऐतिहासिक निर्णयाने नोव्हेंबर आणि डिसेंबर महिना गाजला. भारतीय चलनाचा मुख्य घटक असणाऱ्या पाचशे आणि हजाराच्या नोटांची कायदेशीर मान्यता रद्द झाली. पर्यायाने बँकेत छोट्या नोटांचा भरणादेखील कमी झाला आणि सहकारी बँकांना छोट्या नोटांच्या वितरणासाठी कोणतीही ठोस व्यवस्था अस्तित्वात नसल्यामुळे बँकांपुढे तरलतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. खातेदाराच्या खात्यात पैसे असताना त्यांना ते देता येत नव्हते. एटीएम सेवा ठप्प झाली. बँकांपुढे पैसे काढण्यासाठी ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्या. ग्राहकांची कुचंबणा झाली. या परिस्थितीत कटुता टाळण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले. रद्द चलनी नोटा बदलून देणे, रोजच्या व्यवहारासाठी रोकड व्यवस्थापन करणे यात आपण चोख होतो. अनेक शाखांनी रांगेत उभ्या असलेल्या ग्राहकांना पाणी, चहा, बिस्किटे वाटप केले. स्त्रिया, वृद्धांना आधार दिला. कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे मी कौतुक करतो.

केंद्र सरकारच्या निर्णयाचा परिणाम आपल्या व्यवसायावर देखील झाला आहे. रद्द झालेल्या नोटा डिसेंबर अखेरपर्यंत खातेदारांना आपल्या खात्यात भरता येणार आहेत. त्यामुळे ठेवीत वाढ होते आहे आणि विशेष करून कासा ठेवी वाढत आहेत. काही प्रमाणात ठेवींची किंमतदेखील कमी झाली आहे. ही नोटाबंदीची जमेची बाजू. याउलट नोटाबंदीमुळे छोटे व्यापारी, व्यावसायिक, किराणा दुकानदार, कापड दुकानदार, भाजीविक्रेते, उपाहारगृहे, चित्रपटगृहे यांचा व्यवसाय अडचणीत आला. बाजार थंडावला आणि त्याबरोबरच कर्जाचा विस्तारही मंदावला. बँकेचा सीडी रेशो आणि घसरलेल्या कर्जावरील परताव्यावरून हे जाणवते. कर्जावरील व्याज आपल्या उत्पन्नाचा प्रमुख घटक आहे. यापुढे कर्जाच्या वाढीसाठी प्रयत्न करणे आपली प्राथमिकता आहे.

नोटाबंदीचा मोठा फटका आपल्या कर्जाच्या गुणवत्तेला बसला. थकित कर्जात वाढ झाली, ही बाब गंभीर आहे. नोटाबंदीच्या काळात आपण पर्यायी व्यवस्थेत गुंतलो होतो त्यामुळे कदाचित वसुलीकडे थोडेसे दुर्लक्ष झाले असेल; पण यापुढे वसुलीसाठी कालबद्ध प्रभावी उपाययोजना आखणे गरजेचे आहे. वसुलीप्रक्रियेत प्रत्येक कर्मचाऱ्याला सहभागी व्हावे लागेल. थकित कर्जात कॅश क्रेडिट आणि मुदती कर्जाच्या मर्यादांचे प्रमाण अधिक आहे. लवादाच्या खात्यांतदेखील

➤ पान क्र. ११ वर ...

# ६७ व्या शाखेचे बँकेच्या ६७ व्या वर्धापनदिनी उद्घाटन



**बँकेच्या हडपसर येथील ६७ व्या शाखेचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय राज्यमंत्री श्री. दिलीप कांबळे यांच्या हस्ते दि. १८ ऑक्टोबर २०१६ रोजी करण्यात आले. या प्रसंगी संचालक श्री. बिरु खोमणे, अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक श्री. लक्ष्मण पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर आणि शाखा व्यवस्थापक सुरेश पराड आदी मान्यवर उपस्थित होते.**

### बँकेची हडपसर शाखा कार्यान्वित

बदलत्या काळानुरूप अत्याधुनिक बँकिंग सेवा देण्यात आघाडीवर असणाऱ्या आपल्या बँकेच्या ६७ व्या वर्धापनदिनी ६७ वी हडपसर शाखा कार्यान्वित करण्यात आली. या शाखेचे आणि येथील 'एटीएम' केंद्राचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे व पांडुरंग तथा अण्णासाहेब राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष श्री. संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, संचालक मंडळ सदस्य, जनसेवा बँकेचे अध्यक्ष श्री. प्रदीप जगताप, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शिरीष महाबळ, श्री. आबासाहेब तुपे, श्री. विकास रासकर, श्री. अनिल गुजर व सभासद, खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हडपसर शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एनीव्हेअर बँकिंग, 'एटीएम', 'एनईएफटी', 'आरटीजीएस', विमा आदी आधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उद्घाटनानंतर बोलताना श्री. दिलीप कांबळे म्हणाले, ''सर्वसामान्यांची जिव्हाळ्याची बँक म्हणून जनता सहकारी बँक ओळखली जाते. हडपसर परिसरातील नागरिकांना या माध्यमातून अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध होणार आहेत याचा नागरिकांनी लाभ घ्यावा. शाखा व्यवस्थापक श्री. सुरेश पराड यांनी आभार मानले.

## भवानी पेठ शाखेचे खातेदार श्री. विलासकुमार पालरेशा यांना मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार



**भवानी पेठ शाखेचे खातेदार श्री. विलासकुमार पालरेशा यांना दि. २४/१०/२०१६ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेन्द्रजी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे** BEST PRACTICES IN CUSTOMER CARE VTP REALITY, REALITY BUSINESS ACHIEVERS AWARD 2016 **प्रदान करण्यात आले.**




## चिपळूण शाखेचे कनिष्ठ अधिकारी श्री. प्रसाद कार्ले, कन्या गायत्री कार्लेसह प्रथम पुरस्काराने सन्मानित

आपल्या चिपळूण शाखेचे कनिष्ठ अधिकारी श्री. प्रसाद मोरेश्वर ऊर्फ भाऊ कार्ले यांनी रामोजी फिल्म सिटी हैदराबाद येथे संपन्न झालेल्या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले आहे.



भाऊ कार्ले व गायत्री कार्ले यांनी आपल्या नृत्य-नाट्यकलेने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. गायत्री कार्ले हिने हिंदी फ्यूजन नृत्य केले तर भाऊ कार्ले यांनी इंग्लिश गाणे सादर करतानाच नटसम्राटमधील भावस्पर्शी प्रवेश सादर करून उपस्थितांना हसवता-हसवता भावुक करून मंत्रमुग्ध केले. हैदराबादमधील त्यांच्या या अद्वितीय यशाबद्दल भाऊ कार्ले व गायत्री यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## वर्षा पिरंगुटे यांच्या कथक नृत्याने मिळविली प्रेक्षकांची वाहवा!




आपल्या बँकेचे कर्मचारी श्री. आनंद पिरंगुटे यांच्या पत्नी सौ. वर्षा पिरंगुटे या 'नृत्यांगण' संस्थेच्या संचालिका असून 'कथक रंग' या कार्यक्रमाच्या आयोजिकाही आहेत. संस्थेच्या ३३ व्या वर्धापनदिनी त्यांनी 'कथक रंग' कार्यक्रमात गणेश वंदना, ताल, तोडे, परण सादर केले. त्यांच्या मुद्राभिनय व पदलालित्याने रसिक मंत्रमुग्ध झाले.

## सांगली शाखेचे खातेदार सोपान राजपूत यांची कन्या गायत्रीला बुद्धिबळ स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त



**सांगली शाखेचे खातेदार श्री. सोपान राजपूत यांची कन्या व सांगली शाखेची खातेदार कु. गायत्री सोपान राजपूत हिला आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत सिल्व्हर मेडल मिळाले असून, संपूर्ण राज्यात तिने दुसरा क्रमांक मिळवला आहे.**

**कु. गायत्री हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून सांगली शाखेमार्फत तिचा सत्कार करण्यात आला व तिला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.**

## अभिनंदन - बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी

| सीएआयआयबी |
|---|
| श्री. किशोर दिवाकर देशपांडे - मे २०१६ |

| जेएआयआयबी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. धनंजय श्रीरंग वरंड | फोर्ट | मे २०१६ | सौ. तन्वी आनंद पाध्ये | क्रेडिट सेल, मुंबई | मे २०१६ |
| श्रीमती मिताली महेंद्र देसाई | दादर | मे २०१६ | सौ. अमृता देवीदास कुलकर्णी | रत्नागिरी | मे २०१६ |
| कु. तन्वी दिलीप मोकाशी | मार्केटयार्ड | मे २०१६ | सौ. अमृता इंद्रनील कुलकर्णी | क्रेडिट सेल, मुंबई | मे २०१६ |
| सौ. अस्मिता अनिल जोशी | मार्केटयार्ड | मे २०१६ | | | |

| Anti Money Laundering & Know Your Customer | |
|---|---|
| श्री. नितीन अनंत कुलकर्णी | वरिष्ठ अधिकारी, ऑडिट इन्स्पेक्शन विभाग |
| श्री. सुनिल महादेव जोशी | कनिष्ठ अधिकारी, बाजीराव रोड शाखा |

## शिवराम गाडगीळ सी.एस. परीक्षेत उत्तीर्ण



टिळक रोड शाखेतील खातेदार व स्थानिक सल्लागार समितीच्या सदस्या सौ. गौरी राजेंद्र गाडगीळ यांचे चिरंजीव श्री. शिवराम राजेंद्र गाडगीळ हे सी.एस. परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी त्यांचा सत्कार केला.

# ‘देशाला गरज एका अर्थक्रांतीची’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन





आपली बँक व ग्राहक पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘देशाला गरज एका अर्थक्रांती’ची या विशेष कार्यक्रमाचे आयोजन २९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून अर्थतज्ज्ञ श्री. अनिल बोकील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी आपल्या बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक श्री. सूर्यकांत पाठक, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँन्ड ॲग्रिकल्चरचे कोषाध्यक्ष श्री. चंद्रशेखर चितळे, पुणे सराफा असोसिएशनचे अध्यक्ष श्री. फत्तेचंद रांका, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे (फॅम) श्री. राजेश शहा, ज्येष्ठ पत्रकार श्री. यमाजी मालकर, श्री. रवींद्र प्रभुदेसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

## अर्थतज्ज्ञ श्री. अनिल बोकील यांचे अभ्यासपूर्ण प्रबोधन

आपल्या भाषणामध्ये श्री. बोकील म्हणाले, ‘‘ वस्तू व सेवाकराची स्तुती करताना त्याचा उल्लेख ‘एक राष्ट्र एक कर’ असा होतो; पण ते खरे नाही. आपण स्वीकारलेली वस्तू व सेवाकराचे ‘मॉडेल’ कॅनडाचे असून त्यांची लोकसंख्या केवळ ३.३ कोटी आहे. हा कर १६६ देशांनी स्वीकारला असला तरी त्यातील सर्वांत मोठा देश हा २४ कोटी लोकसंख्येचा इंडोनेशिया आहे. आयात कर वगळता इतर कर रद्द करून केवळ बँकेच्या व्यवहारांवर कर लावणे हाच ‘एक राष्ट्र एक कर’ आहे.’’

या वेळी श्री. खळदकर यांच्या हस्ते श्री. बोकील यांचा शाल, श्रीफळ व तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

# बँकेच्या थकित कर्जाची गणेशोत्सव मंडळाने केली परतफेड

**पुणे :** बँकेचे कर्जदार मधुकर गजमल यांनी डिसेंबर २०१० मध्ये बँकेकडून अडीच लाख रुपयांचे कर्ज घेतले आणि फेब्रुवारी २०११ मध्ये त्यांचे निधन झाले. घरातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे गजमल कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आणि गजमल कुटुंबीय आर्थिक संकटात सापडले. या संकटातून या कुटुंबाला बाहेर काढण्यासाठी पुण्यातील अर्जुन मित्र मंडळाचे अध्यक्ष, कार्यकर्ते पुढे सरसावले आणि त्यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून जमा झालेली रक्कम मधुकर गजमल यांच्या थकित कर्ज खात्यात भरून या कुटुंबाला कर्जमुक्त केले. अशा प्रकारे सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून गणेशोत्सव मंडळाने एक नवीन इतिहास निर्माण केला ही गोष्ट नक्कीच कौतुकास्पद म्हणावी लागेल असे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर यांनी सांगितले.

मा. खळदकर म्हणाले की, मधुकर गजमल यांचे बँकेशी अनेक वर्षांपासून ऋणानुबंध होते. ते पिंपरी येथील ‘एच.ए.स्कूल’ येथे नोकरीस होते. त्यांचा पगार आपल्या बँकेत जमा होत असे. गजमल यांनी डिसेंबर २०१० मध्ये बँकेकडून अडीच लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र दुर्दैवाने फेब्रुवारी २०११ मध्ये त्यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. गजमल कुटुंबीय आर्थिक संकटात सापडले. शिवाजीनगर परिसरातील अर्जुन मित्र मंडळाला ही माहिती समजली. याच परिसरात राहणाऱ्या मधुकर गजमल यांचा मुलगा आशिष गजमल हा मंडळाचा कार्यकर्ता. मंडळातील या कार्यकर्त्याला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष, कार्यकर्ते पुढे सरसावले आणि त्यांनी गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करावयाचे ठरविले. गणेशोत्सवात जमा झालेली रक्कम, गजमल कुटुंबीयांना थकित कर्जाची परतफेड करण्यासाठी दिली. यामुळे गजमल कुटुंबीय कर्जमुक्त झाले. ही गोष्ट नक्कीच वाखाणण्याजोगी आहे.

# ओतूर शाखेचा स्तुत्य उपक्रम

**ओतूर :** कॅशलेस व्यवहारासाठी बँकेच्या ओतूर (ता. जुन्नर) शाखेच्या परिसरातील व्यावसायिकांना स्वाइप मशिनबाबत माहिती शाखा व्यवस्थापक श्री. बाबासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले.

एक हजार व पाचशेच्या नोटा चलनातून बाद केल्यानंतर व्यावसायिकांना रोख रकमेचा तसेच नव्या चलनी नोटांचा तुटवडा जाणवत होता. कॅशलेस व्यवहारासाठी स्वाइप मशिन उपयुक्त असल्याने या मशिनच्या वापराबाबत व्यावसायिकांना माहिती देण्यासाठी आपल्या बँकेने पुढाकार घेतला आहे. या वेळी व्यापाऱ्यांना कॅशलेस व्यवहाराबाबत मार्गदर्शन केले. डेबिट, क्रेडिट, एटीएम कार्डचा वापर करून मशीनद्वारे ग्राहकाच्या खात्यातून व्यावसायिकाच्या खात्यात पैसे कसे विनाविलंब जमा होतात याचे प्रात्यक्षिक दाखविले. व्यावसायिकांनी विचारलेल्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

## भावपूर्ण श्रद्धांजली

बँकेच्या टिळक रोड शाखेतील लेखनिक श्री. सूर्यकांत निवृत्ती इंगुळकर यांचे दि. २८/११/२०१६ रोजी निधन झाले.

# महिलांनी आर्थिक सक्षमतेसाठी निर्णय घेणे गरजेचे : किशोरी गद्रे





**लातूर :** महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ घेऊन आर्थिक बाबतीत निर्णय घेण्याकामी त्यांनी अधिक सक्षम होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन माजी अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती किशोरी गद्रे यांनी केले.

भारतीय स्त्रीशक्ती, शाखा लातूर, विवेकज्योती, मुंबई व आपल्या बँकेची लातूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला सक्षमीकरण व जाणीव जागृती कार्यक्रमात 'महिला आर्थिक सक्षमीकरण' या विषयावर त्या बोलत होत्या. या वेळी अश्विनी मयेकर, ॲड. राजेश्वरी केदार, दूरदर्शनच्या वृत्तनिवेदिका श्रीमती दीपाली केळकर, भारतीय स्त्रीशक्तीच्या डॉ. सौ. ज्योत्स्ना कुकडे, सुलोचना नोगजा, संचालिका डॉ. मधुरा कसबेकर, शाखाधिकारी चंद्रशेखर प्रभुणे, विवेक परिवाराचे विलास आराध्ये आदींची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना श्रीमती किशोरी गद्रे म्हणाल्या की, आपल्याकडे स्त्री-पुरुष विषमता परंपरागत चालू आहे. पण, नाती सांभाळण्याने स्त्री घरच्या कामात कुशल असल्याचे पाहावयास मिळते. दिवसेंदिवस पैशाची ताकद वाढत चालली असल्याने महिलांची आर्थिक क्षमताही बदलत आहे. व्यक्ती आर्थिकदृष्ट्या स्थिर नसेल तर मानसिकदृष्ट्या स्थिर राहणे अवघड जाते. सद्य:स्थितीत आर्थिक सबलतेला अधिक महत्त्व आहे.

आर्थिक सक्षमीकरण म्हणजे काय, हे महिलांनी समजून घेणे आवश्यक आहे. महिला बालकल्याणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ घेऊन महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज आहे. पुरुषांच्या क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करणे हे महिलांसाठी सक्षमतेचेच लक्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. राजेश्वरी केदार यांनी या वेळी 'स्वसंरक्षण' या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. महिला-युवतींनी स्वसंरक्षणासाठी कोणकोणत्या क्लृप्त्या उपयोगात आणल्या पाहिजेत हे त्यांनी सांगितले. दूरदर्शनच्या वृत्तनिवेदिका दीपाली केळकर यांनी 'मन करा रे प्रसन्न अर्थात व्यक्तिमत्व विकास' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी 'विवेक समूहाची वाटचाल' या विषयावर अश्विनी मयेकर यांनी विवेचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. सौ. ज्योत्स्ना कुकडे यांनी भारतीय स्त्रीशक्तीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीरा नायगावकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मधुरा कसबेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. जयंती आंबेगावकर यांनी प्रेरक गीत सादर केले.

## खातेदार राजश्री क्षीरसागर यांना विद्यावाचस्पती पदवी प्राप्त



आपल्या सिंहगड रोड शाखेतील खातेदार सौ. राजश्री विजय क्षीरसागर यांनी ऑक्टोबर २०१६ मध्ये संस्कृत व कोशशास्त्र विषयात पीएचडीचा प्रबंध सादर केला. व त्यांना डेक्कन कॉलेजमधून विद्यावाचस्पती ही पदवी प्राप्त झाली आहे. चिंचवड शाखेतील सेवक श्री. विजय क्षीरसागर यांच्या त्या पत्नी आहेत. त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## गडहिंग्लज शाखेतर्फे आजरा येथे स्नेह मेळाव्याचे आयोजन

गडहिंग्लज शाखेने सप्टेंबर २०१६ मध्ये आजरा येथे स्नेह मेळावा आयोजित केला होता. शाखेपासून सुमारे १८ किमी. अंतरावरील आजरा या गावी बँकेची माहिती व्हावी अशी स्थानिक आजरा येथील नागरिकांनी अपेक्षा व्यक्त केली होती. शाखेने या मागणीनुसार कार्यक्रम आयोजित केला होता.

या वेळी प्रथम स्थानिक व्यापारी व कार्यकर्ते श्री. श्रीपाद कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. बँकेचे गडहिंग्लज शाखा व्यवस्थापक श्री. मंगेश तिरकन्नाड यांनी बँकेची स्थापना, उद्दिष्ट, सामाजिक कार्य, आर्थिक स्थिती, बँकेच्या विविध योजना यांची तपशीलवार माहिती दिली.

## ई-कचरा आणि प्लॅस्टिकमुक्त पुणे अभियान



टिळक रोड शाखेत दि. २६/०८/२०१६ रोजी सत्यनारायण पूजा संपन्न झाली. यानिमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पुणे महानगर आणि टिळक रोड शाखा यांचेतर्फे सामाजिक रक्षाबंधन ई-कचरा आणि प्लॅस्टिकमुक्त पुणे अभियान राबविण्यात आले.

पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने सर्व समाजाला भेडसावणारी ही समस्या सोडविण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# बँकेच्या ओतूर शाखेचे नूतनीकरण; एटीएम केंद्राचे उद्घाटन



बँकेच्या नूतनीकृत ओतूर शाखेचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष संजय लेले यांच्या हस्ते मंगळवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ रोजी एका दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. या प्रसंगी बँकेच्या ओतूर शाखेचे शाखा व्यवस्थापक बाबासाहेब जाधव, डॉ. भरत घोलप, बँकेचे संचालक विजय भावे, संचालक बिरू खोमणे व मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर आदी मान्यवर उपस्थित होते.



एटीएम केंद्राचे उद्घाटन बँकेचे संचालक बिरु खोमणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे संचालक विजय भावे, उपाध्यक्ष संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या बँकेच्या ओतूर शाखेचे मंगळवार, दि. १५ नोव्हेंबर २०१६ रोजी नूतनीकरण करण्यात आले. नूतनीकृत वास्तूचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष संजय लेले यांच्या हस्ते आणि येथील नवीन एटीएम केंद्राचे उद्घाटन संचालक बिरु खोमणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे संचालक विजय भावे, मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर, संचालक मंडळ सदस्य, खातेदार, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओतूर शाखेच्या माध्यमातून बँकेच्या विविध सेवा-सुविधा या भागातील नागरिकांना गेली अनेक वर्षे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर यांनी बँकेविषयी माहिती दिली. या शाखेचे नूतनीकरण करण्यात आले असून या नूतनीकृत शाखेद्वारे ग्राहकांना आणखी चांगल्या आधुनिक सेवा सुविधांचा लाभ घेता येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राधाकृष्ण लिमये यांने केले. ओतूर येथील मान्यवर सर्वश्री नरेंद्र डुंबरे, हेमंत डुंबरे, डॉ. भरत घोलप, माणिकशेट वाळेकर, बाळासाहेब डुंबरे, चंद्रकांत डुंबरे, वैभव तांबे, संतोष तांबे, राजू पन्हाळे आणि रामदास तांबे यांचा बँकेच्या वतीने शाल आणि श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. बँकेची ओतूर शाखा हाऊस नं. ३५४/१, पांढरी मारुती मंदिराजवळ, ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१२ ४०९ येथे कार्यरत आहे.

## निखिलच्या ॲपला एफ.बी. स्टार्ट

आपल्या गांधीनगर शाखेतील खातेदार तसेच स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री. शंकरशेठ दुल्हानी यांचे चिरंजीव श्री. निखिल दुल्हानी यांनी जगभरातील पर्यटकांसाठी यूजर फ्रेंडली आणि माहितीचा खजिना असलेले ट्रिपोर्ब हे ॲप तयार केले आहे.




या ॲपवर जगभरातील सर्व पर्यटन स्थळांची माहिती, हॉटेल्स, त्यांचे बुकिंग, प्रत्येक देशातील मुख्य फेस्टिव्हल्स, सोशल नेट वर्किंगच्या माध्यमातून ग्रुप करण्याची माहिती इ. सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध आहे. प्रसिद्ध फेसबुक कंपनीने या उपक्रमाची दखल घेऊन त्यांना त्यांच्या एफ.बी. फंडामधून पुढील ॲप डेव्हलपमेंटसाठी ४० हजार डॉलर्स एवढा निधी उपलब्ध करून दिला आहे.

निखिल दुल्हानी यांच्या ट्रिपोर्ब ॲपला गेल्या पंधरा दिवसांत ८०० हून अधिक डाउनलोड सिंगापूर, मलेशिया, अमेरिका येथून प्राप्त झाले आहेत.

सदर ॲपची माहिती www.triporb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. श्री. दुल्हानी यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी गरुडझेप परिवारातर्फे शुभेच्छा!

## माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१६ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| मिलिंद त्र्य. वाडेकर | क. अधिकारी | तळेगाव स्टेशन |
| राजीव शा. सायगांवकर | क. अधिकारी | नेट बँकिंग सेल |
| सुरेश ब. झेंड | क. अधिकारी | तळेगाव दाभाडे |
| विवेक वा. केळकर | लेखनिक | विलेपार्ले |
| संजय मा. जोशी | लेखनिक | तळेगाव दाभाडे |
| बाळकृष्ण न्हा. चव्हाण | लेखनिक | गोरेगाव |
| चंद्रकांत श्री. कुलकर्णी | लेखनिक | लातूर |
| विलास न. जिंदम | लेखनिक | चिंचवड गाव |
| दत्तात्रय र. देशपांडे | शिपाई | इंदापूर |

### Knowledge Page

संग्राहक : अभय बापट

प्रत्येक व्यक्तीत काहीना काही दुर्गुण असतातच. पण वरकरणी ती स्वच्छ व चारित्र्यसंपन्न वाटते. अशा व्यक्ती मधील छुपे अवगुण वर्णन करताना आयार्विंग वॉलेस या लेखकाने एक छान वाक्प्रचार वापरला आहे, EVERY MAN HAS SHADOW

# टिळक रोड शाखेच्या वतीने डिजिटल पेमेंट-कॅशलेस व्यवहार अभियान



बँकेच्या टिळक रोड शाखेच्या वतीने दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी जागतिक चहा दिनाचे निमित्ताने बँकेच्या ग्राहकांसाठी डिजिटल पेमेंट-कॅशलेस व्यवहार अभियानांतर्गत एकत्रिकरण व चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर व जॉईंट जनरल मॅनेजर मा. श्री. दिलीप कुलकर्णी उपस्थित होते. शाखा व्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थितांचे स्वागत करून बँकेने गेल्या दहा वर्षांत केलेल्या टेक्नोबेस सर्व्हिसेसच्या प्रगतीचा आढावा घेतला. बँकेतर्फे दिल्या जाणाऱ्या टेक्नोबेस सर्व्हिसेसची माहिती डेटासेंटर मधील अधिकारी श्री.संदीप चव्हाण व कल्याणी देशपांडे यांनी ग्राहकांना दिली. व त्यांच्या शंकांचे निरसन केले.

शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी उपस्थिताचे आभार मानले.

## बँकेचे माजी संचालक मा. रमेशदादा खत्री यांच्या हस्ते श्री. अनिरुद्ध रजपूत यांचा गौरव



दि.२३.१२.२०१६ रोजी जुन्नर शाखेतर्फे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय कायदे मंडळावर सर्वाधिक मताधिक्याने निवडून आलेले भारताचे सर्वात तरुण प्रतिनिधी (वय ३३) श्री.अनिरुद्ध धनंजय रजपूत यांचा बँकेचे माजी संचालक श्री रमेशदादा खत्री यांच्या हस्ते मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. श्री.अनिरुद्ध रजपूत याची २०१७ ते २०२२ या कालावधीसाठी निवड झाली आहे. सदर कार्यक्रमास शाखेचे स्थानिक सल्लागार सदस्य श्री नाना जोगळेकर, डॉ.कर्णावट, माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक श्री दिनेश दुबे, सन्माननीय खातेदार श्री गणेश परदेशी, श्री अमर भगत, कर सल्लागार श्री सुनील सोनपाटकी, जुन्नर व्यापारी असोसिएशनचे श्री उल्हास्कुमार शहा इ. उपस्थित होते.

# आंतर बँक कबड्डी व रस्सीखेच या स्पर्धांमध्ये बँकेस स्पृहणीय यश





क्रीडा भारती व सहकार भारती पुणे महानगर यांचेतर्फे ''राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त'' आंतर बँक कबड्डी व रस्सीखेच स्पर्धांचे रविवार, दि.२८ ऑगस्ट २०१६ रोजी पं.नेहरू स्टेडीयम, पुणे येथे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांचे उद्घाटन समारंभास बँकेचे उपाध्यक्ष मा.श्री. संजय लेले, क्रीडा भारतीचे मा.श्री. राज चौधरी, श्री.शैलेश आपटे, श्री.मिलिंद डांगे, श्री.राजेंद्र शिदोरे व अन्य पदाधिकारी तसेच सहभागी बँकांचे सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये आपल्या बँकेबरोबरच ठाणे जनता सहकारी बँक आणि जनसेवा सहकारी बँक इ. बँकांच्या संघांनी सहभाग घेतला होता. आपल्या बँकेने कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात अजिंक्यपद मिळविले. तसेच महिलांच्या संघाने रस्सीखेच स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले.

बँकेचे कबड्डी संघात श्री.प्रकाश इंगवले (कर्णधार), श्री.केदार आंबेकर, श्री.अभिजीत कुऱ्हाडे, श्री.अमोल देडे, श्री.नितीन क्षीरसागर, श्री. भरत थोपटे, श्री.अभिजीत हरेकर, श्री.अमोल कदम, प्रशिक्षक श्री.सुनंदन लघाटे यांचा सहभाग होता. तसेच बँकेचे रस्सीखेच संघात सौ.सुखदा कुलकर्णी, कु.सिद्धी मोने, कु.चित्रा सुरकुले, कु.मुक्ता आरे, सौ. रुपाली कदम, सौ.भाग्यश्री शिपटे, सौ.संपदा चौक, चेतना मराठे, अपर्णा कदम, दीपीका घोणे, या महिला सेवकांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेसाठी प्रमुख पंच म्हणून श्री.योगीराज टकले यांनी काम पाहिले. स्पर्धा प्रमुख म्हणून श्री.विजय रजपूत यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ स्टाफ वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष मा.श्री.विजय निल्दावार व सेक्रेटरी श्री.रविंद्र धुमाळ यांचे हस्ते झाला.

# आनंदाची पाठशाळा : 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला'

## बुद्धिमत्ता, कल आणि क्षमता

* मल्टिपल इन्टेलिजन्स,
* कल आणि क्षमता,
* आवड आणि ओढा,
* प्रेरणा,
* ॲप्टिट्यूड मापन चाचण्या.

मित्रांनो, कल चाचणी ही एक शास्त्रशुद्ध पद्धत आहे. या पद्धतीबद्दल आणखी जाणून घेण्याआधी आपण यात नेहमी वापरण्यात येणाऱ्या संज्ञांबाबत माहिती करून घेऊ.


सर्वप्रथम बुद्धिमत्ता (इन्टेलिजन्स) या संज्ञेचा विचार करू. प्रत्येक व्यक्ती जन्मास येताना काही जनुकीय माहिती आई-वडिलांकडून घेऊन येते. पुढे जसजसे मूल मोठे होते तसतशी त्याची बुद्धिमत्ता वाढत जाते आणि साधारणत: १२ वर्षांत ती बरीचशी परिपूर्ण होते.

बुद्धिमत्ता (इन्टेलिजन्स) या विषयाचा अभ्यास जगभर अनेक मानसशास्त्रज्ञ तसेच मेंदूचा अभ्यास करणारे (न्यूरोसायन्स/न्यूरोसायकॉलॉजी) तज्ज्ञ करतात. या विषयावर अनेक शोधनिबंध सतत प्रसिद्ध होत असतात. या विषयातला महत्त्वाचा सर्वसाधारण निष्कर्ष असा :

'बुद्धिमत्ता ही आनुवंशिकता आणि वातावरण यांवर अवलंबून असते.'

(Intelligence is determined by Heredity and Environment.)

मुलाची वाढ होत असताना त्याच्या घरचे वातावरण, सामाजिक परिस्थिती, कुटुंबाची आर्थिक स्थिती, संस्कृती, शाळेमधील सुविधा, शिक्षकांचे योगदान, पालक, आई-वडील यांची शैक्षणिक स्थिती, मुलाच्या कुतूहलाला मिळणारे उत्तेजन, मुलाचे आरोग्य, आहार अशा अनेक



गोष्टींवर बुद्धिमत्तेची वाढ अवलंबून असते. साहजिकच एकाच वयाच्या मुलांमध्ये एकसारखी बुद्धिमत्ता मानणे चुकीचे आहे. कोणत्याही

**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला' या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

दोन व्यक्तींच्या बुद्धिमत्तेमध्ये फरक असतो. बुद्ध्यंक मापन चाचण्या काही दशके वापरात आहेत आणि त्या चाचण्या घेण्याच्या पद्धतीमध्ये अनेक बदल आजवर केले गेले आहेत, पण तरीही बुद्ध्यंक हे बुद्धिमत्तेचे खरे निर्देशक आहे किंवा नाही यामध्ये मतभिन्नता आहे.

मल्टिपल इन्टेलिजन्स : बुद्धिमत्ता (मल्टिपल इंटेलिजन्स) अनेक प्रकारच्या आहेत असा विचार सर्वप्रथम हॉवर्ड गार्डनर या शास्त्रज्ञाने १९८३ मध्ये मांडला आणि एक नवीन मतप्रवाह या क्षेत्रात निर्माण केला. गार्डनरने प्रथमत: ६-७ प्रकारच्या बुद्धिमत्ता नोंदल्या होत्या. तदनंतर झालेल्या संशोधनाप्रमाणे आता पुढील १० प्रकारच्या बुद्धिमत्ता आहेत, असे मानले जाते. त्या खालीलप्रमाणे :-

१) तर्कशुद्ध आणि गणिती विचार करणारी (लॉजिकल, मॅथेमॅटिकल इन्टेलिजन्स)

२) भाषाविषयक (लिंग्विस्टिक इन्टेलिजन्स)

३) त्रिमितीय विचार (स्पॅशिअल इन्टेलिजन्स)

४) संगीतविषयक (म्युझिकल इन्टेलिजन्स)

५) खेळ आणि शरीरसंपदा (बॉडीली/ कायनेस्थिटिक इन्टेलिजन्स)

६) माणसामाणसांमधले संबध (इंटरपर्सनल इन्टेलिजन्स)

७) आत्मशोधन स्वाभाविक आत्मचिंतन (इंट्रापर्सनल इन्टेलिजन्स)

८) निसर्गविषयक (नेचर रिलेटेड)

९) आध्यात्मिक (स्पिरिच्युअल इन्टेलिजन्स)

१०) अस्तित्वविषयक (एक्सिस्टेन्शनल इन्टेलिजन्स)

गार्डनरच्या मते पहिल्या दोन बुद्धिमत्ता अभ्यासाशी निगडित आहेत. त्रिमितीय विचार ही बुद्धिमत्ता शिल्पकार, आर्किटेक्ट, डिझायनर्स, बुद्धिबळ खेळाडू यांना उपयोगी असते. संगीतविषयक बुद्धिमत्ता ही संगीतक्षेत्राशी निगडित आहे. तर खेळाडू, नर्तक, कलाकार, शल्यविशारद यांना खेळ-शारीरविषयक बुद्धिमत्ता उपयोगी आहे. माणसामाणसांचे संबंध, तसेच आत्मशोधन, आत्मचिंतन या प्रकारची बुद्धिमत्ता (इंटरपर्सनल आणि इंट्रापर्सनल) समाजात वावरताना, स्वत:ला ओळखण्यासाठी उपयोगी असते. समुपदेशक, मार्गदर्शक, राजकीय नेते, विक्रेते, सामाजिक कार्य करणारे, व्यवस्थापन क्षेत्रात काम करणारे यांना ही बुद्धिमत्ता उपयोगी असते.

**भावनिक बुद्धिमत्ता (इमोशनल इन्टेलिजन्स)**

वायन पेन (Wayne Payne), ग्रीनस्पॅन, मेयर, गोमन इत्यादी शास्त्रज्ञांनी 'भावनिक बुद्धिमत्ता' (इमोशनल इन्टेलिजन्स) अशी संकल्पना मांडली. या संकल्पनेवर आधारित नियोजन, व्यवस्थापन, नेतृत्व आदी कल्पनांचा विकास गेल्या २०-२५ वर्षांत झाला आहे.

सारांश असा की बुद्धिमत्ता ही संकल्पना सर्वमान्य आहे. पण ती एकाच प्रकारची आहे की अनेक प्रकारची आहे. तसेच बुद्धिमत्तेचे मापन कितपत उपयोगी आहे, यावर मतभिन्नता आहे.

**व्यक्ती तितक्या प्रकृती :-**

'मित्रांनो, प्रत्येक व्यक्तीची बुद्धिमत्ता वेगळी असते. तसेच ती बऱ्याचशा प्रमाणात मुलाची वाढ कोणत्या प्रकारे होते यावर अवलंबून असते. यशस्वी होण्यासाठी बुद्धिमत्ता चांगली असेल तर नक्कीच मदत होते. अर्थात, बुद्धिमत्ता या अनेक प्रकारच्या आहेत असे मत मान्य केल्यास यशस्वी व्यक्ती ही त्या त्या क्षेत्राला आवश्यक असणारे ज्ञान असणारी आहे असे निश्चित. लतादीदींच्या गाण्याबद्दल किंवा सचिनच्या खेळाबद्दल आपण सर्व जाणतोच. ते दोघेही त्यांच्या क्षेत्रात प्रचंड यशस्वी आहेत. त्यांची त्या क्षेत्रातील बुद्धिमत्ता उत्तम आहे असे आपण निश्चित म्हणू. म्हणजे फक्त अभ्यासात हुशार असणे हे एकच बुद्धिमत्तेचे लक्षण आहे असे मानणे योग्य नाही. अर्थात, माझ्या समुपदेशनाच्या अनुभवावर आणि संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या अभ्यासातून मी निश्चितपणे सांगतो की बुद्धिमत्ता, व्यवहारज्ञान, स्वत:ला ओळखणे, तसेच भावनिक आणि माणसामाणसांमधील संबंध याबाबतचे ज्ञान असणाऱ्यांना यशस्वी होणे अवघड नसते.'

**क्रमश:**

# जीएसटीमुळे फायदा होईल : सीए मुकुंद अभ्यंकर

**शनिवार** – नारायण पेठ व शिवाजीनगर पुणे शाखेच्या वतीने दि. २९ ऑगस्ट २०१६ मा. श्री. एम. के. अभ्यंकर, सनदी लेखापाल यांचे 'जीएसटी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या वेळी अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, संचालक मा. श्री. सुधीर पंडित, संचालिका मा. डॉ. सौ. मधुरा कसबेकर, शाखा व्यवस्थापक श्री. महेश काळे उपस्थित होते.

शाखा व्यवस्थापक श्री. महेश काळे यांनी बँकेची मार्च २०१६ ची व्यावसायिक स्थिती तसेच शाखेची सध्याची स्थिती, मागील सहा महिन्यांमध्ये शाखेने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. नुकतेच चौंडेश्वरी बँकेच्या विलीनीकरणाचीही माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. एम. के. अभ्यंकर यांचा बँकेचे अध्यक्ष मा. श्री. खळदकर साहेब यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

श्री. एम. के. अभ्यंकर यांनी आपल्या विषयामध्ये खालील गोष्टींचा ऊहापोह केला. जीएसटीमुळे देशातील बाजारपेठांमध्ये सर्व वस्तू सारख्या किमतीत उपलब्ध होतील. जी.एस.टी. लागू झाल्यानंतर पहिल्या वर्षी महागाई असेल. मात्र त्यानंतर देशात वाढलेली महागाई आटोक्यात येईल आणि 'इज ऑफ डुइंग बिझनेस' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होईल.

सरकारमधील अधिकाऱ्यांनी जीएसटी कायद्याच्या मसुद्यामध्ये काही व्यापक तरतुदी केल्यामुळे सध्या गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. वस्तूच्या विक्री बिलाची तारीख ही कर आकारणीसाठीची तारीख ग्राह्य धरली असती, तर अधिक सोपे झाले असते. एखाद्या वस्तूचा उपभोग कोणत्या ठिकाणी घेतला यावर संबंधित राज्याच्या करांमधील वाटा ठरेल. त्यामुळे जीएसटी कायद्यामध्ये उपभोक्त्याचे ठिकाण आणि वेळ महत्त्वाची ठरणार आहे. अजून या मुद्द्यावर बरीच स्पष्टता येण्याची गरज असून कायद्यातील क्लिष्टता दूर होण्याची आवश्यकता आहे.



सध्या साडेबारा टक्के मूल्यवर्धित कर आणि साडेबारा टक्के अबकारी कर आहे. जीएसटीचा दर १८% असेल तर बहुतेक सर्व वस्तूंच्या किमती कमी होतील. जीएसटीमुळे संपूर्ण देशात एकच सामायिक बाजारपेठ निर्माण होणार आहे. त्याचा मोठा परिणाम राष्ट्रीय सकल उत्पन्नावर (जीडीपी) होईल. जीएसटीमुळे अनेक जण कर व्यवस्थेत समाविष्ट होऊन कर भरतील व त्यामुळे महसुलात वाढ होईल. १ एप्रिल २०१७ पासून देशभरात जीएसटी लागू होऊन चांगला बदल होणार असून अर्थव्यवस्थेत चांगली सुधारणा होईल, असे वाटते. त्यानंतर उपस्थितांमधून काही खातेदारांनी प्रश्न विचारून समाधान करून घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुजा संत यांनी केले. आभारप्रदर्शन श्री. श्रीनिवास भिमपल्ली यांनी केले. समारोप श्री. अजय गंधे यांनी पसायदानाने केला.

दि. ३१/०८/२०१६ रोजी मा. मुकुंद अभ्यंकर यांचे जीएसटी वरील व्याख्यान आपल्या कोल्हापूर शाखेने आयोजित केले होते. सदर कार्यक्रमात बँकेचे ज्येष्ठ संचालक श्री. पंडीत यांनीदेखील मार्गदर्शन केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते बँकेच्या मोबाईल ॲपचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी स्थानिक सल्लागार सदस्य श्री.एम. जी.वालीखिंडी, श्री. दिलीपराव माने, श्री. राजाभाऊ मेंढके, श्री. विद्याधर देवधर, व श्री. घनश्याम रावळ उपस्थित होते. तसेच शाखेचे मा. खातेदार, उद्योजक श्री. वाडीकर, श्री. बुधले, श्री. सत्रे, श्री. कडूकर, श्री. थिटे, अनेक संस्थांचे चार्टर्ड अकांऊंटंट, इंजिनियर, बँकेचे, पतसंस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## चिंचवडगाव शाखेमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्गाचे आयोजन

फत्तेचंद जैन शाळेतील विद्यार्थ्यांना बँकिंगविषयक माहिती व्हावी यासाठी शाखेमार्फत शाखेतच सर्व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग आयोजित करणेसाठी शाळेने शाखेला विनंती केली होती. त्याला त्वरित प्रतिसाद देऊन शाखा व्यवस्थापक श्री. नाखरेसाहेब यांनी शिक्षकांशी विचारविनियम करून दि. २९/०९/२०१६ रोजी अभ्यासवर्गाचे आयोजन केले.

या अभ्यासवर्गासाठी इयत्ता ११वी व १२वी चे विद्यार्थी उपस्थित होते. शाखेतील वरिष्ठ अधिकारी श्री. सचिन ढवळे यांनी कार्यक्रम नियोजन केले व उपस्थित विद्यार्थ्यांना बचतठेव खाती, चालू ठेव, कर्जांचे विविध प्रकार, ATM, RTGS, NEFT इ.बाबत सखोल माहिती सांगितली व विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. शाळेतर्फे सौ. जगताप व घुजरे मॅडम व श्री. बेळगे सर उपस्थित होते. त्यांनी सदर अभ्यासवर्गाबाबत समाधान व्यक्त केले. शाखेतील अधिकारी श्री. वसंत सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शाखा वर्धापनाच्या शुभेच्छा!
## (माहे जानेवारी ते मार्च २०१७)

| | |
|---|---|
| १. तळेगाव दाभाडे | २९ जानेवारी |
| २. कडवई | २९ जानेवारी |
| ३. शिवाजीनगर पुणे | ३ फेब्रुवारी |
| ४. बाणेर | १४ फेब्रुवारी |
| ५. तळेगाव स्टेशन | १७ फेब्रुवारी |
| ६. चिंचवड स्टेशन | २५ फेब्रुवारी |
| ७. जुन्नर | २६ फेब्रुवारी |
| ८. लातूर | २६ फेब्रुवारी |
| ९. टिळक रोड | २७ फेब्रुवारी |
| १०. शनिवार नारायण पेठ | २७ फेब्रुवारी |
| ११. औरंगाबाद | २७ फेब्रुवारी |
| १२. इंदापूर | २९ फेब्रुवारी |
| १३. ठाणे, घोडबंदर | १ मार्च |
| १४. सिंहगड रोड | ५ मार्च |
| १५. पौड रोड | २१ मार्च |
| १६. सोलापूर | २१ मार्च |

# लातूर शाखेच्या वतीने भातंगळी येथे बिझनेस करस्पाँडंट सुविधा सुरू






बँक वर्धापनाचे औचित्य साधून लातूर, भातंगळी येथे B.C. (बिझनेस करस्पाँडंट) सुविधेची सुरुवात झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या पुतळ्याचे पूजन करून वर्धापनदिन सोहळ्याची सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविक शाखाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर प्रभुणे यांनी केले. त्यामध्ये बँकेमार्फत गावात मिळणाऱ्या सेवा इ. माहिती दिली.

त्यानंतर उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रा. स्व. संघ भाग संघचालक मा. श्री. वेंकटसिंग चौहान, मा. श्री. आप्पा लातूरे, सरपंच सौ. रेखाताई करवडे, सेवा निवृत्त शिक्षक जनार्दन कासले व ज्येष्ठ नागरिक श्री. शंकरराव बोळगे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता बँकेचे सेवक श्री. व्यंकट जटाळ यांच्या आभारप्रदर्शन व पसायदानाने करण्यात आली.

# टिळक रोड शाखेतर्फे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दीपावलीनिमित्त मदत

आपल्या बँकेच्या प्रत्येक शाखेकडून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याअंतर्गत टिळक रोड शाखेत नव्याने स्थापन केलेल्या 'खातेदार सेवक स्नेह मंडळाच्या' वतीने पुणे विद्यार्थी गृहाच्या ४५ अनाथ-गरजू विद्यार्थ्यांना दीपावली निमित्ताने नवीन कपडे व फराळाचे वाटप कार्यक्रम २६ ऑक्टो. २०१६ रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी आपल्या बँकेचे संचालक मा. श्री. सुधीर पंडित, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर, उपस्थित होते. तसेच देणगीदार व खातेदार उपस्थित होते. पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या वतीने संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री. सुभाषराव जिरगे, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. डॉ. टी. आर. गोराणे, पर्यवेक्षक मा. श्री. भागवत शेलार, मा. श्री. युवराज मिरखलकर व अन्य शिक्षक गण तसेच सेवक उपस्थित होते.

शाखेतील सहव्यवस्थापक श्री. संजय चतुर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्यानंतर शाखा व्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी बँकेबद्दल विस्तृत माहिती दिली. सामाजिक बांधिलकीचे जाणिवेतून शाखेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, त्यातूनच हा उपक्रम घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मोठ्या व्यावसायिकांबरोबरच 'छोट्या लोकांची मोठी बँक' असल्याने समाजातील गरजू व होतकरू व्यक्ती-व्यावसायिकांना प्राधान्याने मदत करीत असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

प्रास्ताविकानंतर मान्यवर ग्राहक, मा. पंडित, मा. जिरगे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांपैकी श्री. उत्पात, श्री. न. म. जोशी, श्री. एस. आर. कुलकर्णी, यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. एस. आर. कुलकर्णी यांनी विशेषत: विद्यार्थ्यांना उद्देशून आवाहन केले की, विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या मागे न धावता व्यावसायिक होऊन नोकरी पुरविण्याची जिद्द ठेवावी. संस्थेच्या संस्थेच्या वतीने मा. श्री. सुभाषराव जिरगे, मा. श्री. डॉ. टी. आर. गोराणे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व संबंधित मान्यवरांनी बँक आर्थिक व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकी करीत असलेल्या विविध उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले.

मा. श्री. सुधीर पंडित यांनी या वेळी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. डॉ. टी. आर. गोराणे यांनी आभार व्यक्त केले.

# जनता सहकारी बँकेची मोबाईल बँकिंग सेवा

आता जनता सहकारी बँकेची मोबाईल बँकिंग सेवा Android, Windows, या ऑपरेटिंग सिस्टीमवर चालणाऱ्या मोबाईल फोनप्रमाणेच आय.ओ.एस. या ऑपरेटिंग सिस्टीमवर चालणाऱ्या iPhone या मोबाईलसाठी सुद्धा उपलब्ध झाली आहे. बँकेचे जे ग्राहक iPhone हा मोबाईल वापरतात त्यांना iPhone वरील ॲप स्टोअरवर जाऊन बँकेचे Janata Bank Mobile Application डाउनलोड करता येईल. मोबाईलवर सदर ॲप्लिकेशनचा वापर करता येणेसाठी बँकेकडे या सेवेकरिता रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. याकरिता ग्राहकांनी शाखेमध्ये आवश्यक तो फॉर्म भरून द्यावा.




जनता बँकेच्या मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे बँकिंग व्यवहारांचे तपशील जाणून घेणे, खात्यातील शिल्लक पाहणे, मुदतठेव खाते उघडणे, स्वत:च्याच अन्य खात्यांमध्ये तसेच अन्य बँकांच्या खात्यांमध्ये पैशांचे हस्तांतरण करणे, मोबाईल आणि डीटीएच रीचार्ज, तसेच वीज, इन्शुरन्स, फोन, पोस्टपेड बिल इ. बिले भरणे आणि beneficiary addition करणे इ. सुविधा उपलब्ध आहेत.

Android, Windows & iPhone मोबाईल वापरणाऱ्या बँकेच्या सर्व ग्राहकांनी या सेवेचा लाभ घ्यावा व पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार जास्तीतजास्त ग्राहकांनी बँकेचे JSB Easy Net हे ॲप्लिकेशन वापरून कॅशलेस व्यवहारास प्राधान्य द्यावे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काळ्या पैशाविरुद्ध एल्गार



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भ्रष्टाचार, काळा पैसा, दहशतवाद, बनावट नोटा आणि अवैध व्यवहार रोखण्यासाठी मंगळवार, दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पाचशे आणि एक हजार रुपयांच्या नोटा मध्यरात्रीपासून चलनातून बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा पंतप्रधानांनी दूरदर्शनवरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणाद्वारे केला. याच वेळी त्यांनी एक हजार रुपयांच्या नोटा चलनातून पूर्णपणे बंद होणार असून पाचशे रुपयांच्या व दोन हजार रुपयांच्या नव्या नोटा चलनात येणार असल्याची देखील घोषणा केली.

पंतप्रधान मोदी यांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाने सारा देश अक्षरश: ढवळून निघाला. देशातील तमाम जनतेने पंतप्रधानांच्या या घोषणेचे स्वागत केले. १० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ या कालावधीत नागरिकांनी रु. ५०० व रु १०००च्या जुन्या नोटा बँकेत तसेच टपाल कार्यालयात जमा कराव्यात असे आवाहनदेखील पंतप्रधानांनी जनतेला केले. या घोषणेनंतर देशभरातील बँका व टपाल कार्यालयांत पैसे भरण्यासाठी आणि काढण्यासाठी रांगेत उभे राहणाऱ्या काही लोकांना पैशाची चणचण भासू लागली. पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहणाऱ्या काही लोकांना मृत्यूने कवटाळले. बाजारातील व्यवहार ठप्प झाले. उलाढाल मंदावली. अर्थव्यवस्थेची घडी काही प्रमाणात मंदावली. विरोधकांनी नोटाबंदीमुळे सर्वसामान्य जनतेला होणाऱ्या हालाची ढाल पुढे करीत त्याच भांडवल करून पंतप्रधानांच्या या निर्णयाच्या विरुद्ध जोरदार आवाज उठविला. राज्यसभा व लोकसभेत विरोधकांनी गोंधळ घालून नोटाबंदीविरोधात सरकारला घेरण्याची एकही संधी सोडली नाही.

नोटाबंदी विरोधात देशभरात वातावरण तापत ठेवण्याचे काम विरोधक एका बाजूला करीत असतानाच सर्वसामान्य जनता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे चित्र देशाच्या कानाकोपऱ्यांत दिसून आले. पैशाची चणचण भासत असतानादेखील सर्वसामान्य जनता त्रास सहन करीत नोटाबंदीच्या निर्णयाचे जाहीर कौतुक करताना दिसत होती. हे चित्र नक्कीच आशादायक म्हणावे लागेल.

पाचशे व हजाराच्या नोटांची रातोरात रद्दी करणारा हा निर्णय ज्यांनी मोठ्या प्रमाणावर काळा पैसा दडवून ठेवला आहे, त्यांना दणक़ा देणारा आहे. यामुळे देशभरातील काळ्या धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहे. देशाची अर्थव्यवस्था सुदृढ करण्यासाठी या धाडसी निर्णयाची नक्कीच आवश्यकता होती. जनतेच्या दृष्टीने हा निर्णय अनपेक्षित आणि एका रात्रीत घेतलेला असला, तरी सरकारने मात्र खूपच विचारपूर्वक निर्णय घेतला आहे, हे सांगावयास नको. काळ्या पैशाचे अमाप पीक आले की मोठ्या नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय अनेक देशांनी यापूर्वी घेतलेला आहे. १९७८ मध्ये मोरारजी देसाई यांनी पंतप्रधान असताना एक हजार व त्यापेक्षा अधिक रकमेच्या नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. महत्त्वाचे सांगणे इतकेच की, असा धक्कादायक निर्णय घेण्याचे धाडस दाखवावे लागते. हे धाडस नरेंद्र मोदी यांनी दाखविले याबद्दल त्यांचे देशभर कौतुक होत आहे.

वेगवेगळ्या सर्वेक्षणांनुसार आपल्या देशात राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) जवळपास ५० टक्के इतका काळा पैसा असल्याचे दिसून येते. त्यापैकी ८ ते १० टक्के काळा पैसा परदेशांत आहे. त्यामुळे देशातील काळ्या पैशावर लक्ष केंद्रित करणे अपरिहार्य झाले होते. हा काळा पैसा मुख्यत: जमीन, सदनिका, सोने-चांदी, दागदागिने, निवडणुकीचे राजकारण इत्यादींमध्ये उपयोगात येत होता हे उघड सत्य आहे. काळ्या पैशाची निर्मिती दिवसाढवळ्या खुलेआम होताना दिसत असताना त्याविषयी केवळ चिंता व्यक्त करणे, चर्चेची गुऱ्हाळे चालू ठेवणे अपेक्षित नव्हते. यासाठी हवी होती राजकीय इच्छाशक्ती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांनी नोटाबंदीसंबंधीचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. या निर्णयाची त्यांना किंमतही मोजावी लागत आहे. या निर्णयाने अनेक समस्या निर्माण होत असल्याचे रोजच दिसून येत आहे. देशातील बँकिंग यंत्रणा, त्यामधील कार्यक्षमता, सामान्य माणसाची रोख पैशाची गरज आणि तंत्रज्ञान यांचा ताळमेळ ठेवणे ही कसरत करावी लागत आहे. अधिकाधिक व्यवहार बँकांमार्फत अथवा डेबिट, क्रेडिट कार्डाद्वारे करणे, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंगचा जास्तीतजास्त वापर करणे, ई-वॉलेटचा वापर वाढविणे यातूनच रोख रकमेतील व्यवहार संपुष्टात येतील. या निर्णयामुळे वेगवेगळ्या समस्या पुढे आल्या त्यावर सरकारने शक्य तितक्या उपाययोजना जाहीर करून त्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्नदेखील केला. मात्र, हे उपाय पुरेसे नसल्याचे दिसून आले. नोटाबंदीच्या निर्णयाने चांगली सुरुवात झाली असून सामान्य व्यक्तीला गैरसोय, मनस्ताप सहन करावा लागत आहे. मात्र, या ऐतिहासिक निर्णयाने आपली अर्थव्यवस्था आणखी पारदर्शक, कॅशलेस आणि प्रामाणिक बनण्याकडे वाटचाल करेल, असा विश्वास बाळगायला हवा.

**आपल्या बँकेनेदेखील नोटाबंदीच्या घोषणेनंतर रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी केलेल्या सूचनांचे, नियमांचे काटेकोरपणे पालन केले. ग्राहकांना कमीतकमी त्रास सहन करावा लागावा, यासाठी रोकड व्यवस्थापन, रांगांचे व्यवस्थापन केले. रांगेत उभे राहणाऱ्या ग्राहकांना बसण्याची, चहा-पाण्याची व्यवस्था केली. ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळी रांग केल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला. मा. अध्यक्ष यांचेसह संचालक मंडळ सदस्यांनी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या बँकेच्या विविध शाखांना भेटी देऊनदेखील रोकड व्यवस्थापनाचा आढावा घेतला.**

**ग्राहकांशी चर्चा करून त्यांच्या समस्या/अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना केल्या. या सर्व प्रयत्नांमुळेच आपल्या बँकेच्या सर्व शाखांमध्ये पैसा जमा करण्याचे व काढण्याचे काम ग्राहकांना फारसा त्रास सहन न करता करता आले. सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्गाने घेतलेल्या परिश्रमामुळे हे अवघड काम आपल्याला सोपे करता आले.**

अर्थक्रांती प्रतिष्ठानचे प्रमुख अनिल बोकील यांच्या अर्थक्रांती या संकल्पनेच्या आधारेच हा नोटाबंदीचा निर्णय घेतला गेला असे बोलले जाते. याचा विचार करून आपल्या बँकेने ग्राहक पेठेच्या सहकार्याने पुण्यात टिळक स्मारक मंदिरात अनिल बोकील यांचे जाहीर व्याख्यान आयोजित केले होते. याला पुणेकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला. टिळक स्मारक मंदिर गच्च भरले होते. पार्किंगमध्ये उभे राहून अनेकांनी शांतपणे बोकील यांचे भाषण ऐकले.

नागरी सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेने मागणीनुसार योग्य असा चलनपुरवठा करावा, यासाठी पुण्यातील सर्व सहकारी बँकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला होता. या मोर्चात आपल्या बँकेचे संचालक मंडळ सदस्य, कर्मचारी सहभागी झाले होते. सर्व बँकांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

१० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर हे ५० दिवस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेकडे मागितले आहेत. भारतातील सर्वसामान्य जनतेने दैनंदिन व्यवहारातील त्रास सहन करीत हे ५० दिवस पंतप्रधानांच्या मागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी दिले आहेत. संपूर्ण देश, देशाची अर्थव्यवस्था याचा विचार करता हे पन्नास दिवस भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील निर्णायक दिवस ठरण्याची शक्यता आहे. या धाडसी निर्णयातून भविष्यकाळात नक्कीच आशादायक चित्र निर्माण होईल, अशी आशा १२५ कोटी भारतीय बाळगून आहेत.

प्रसाद घारे
जनसंपर्क अधिकारी
जनता सहकारी बँक, पुणे
मो. : ९३७३००५४४८

**महत्त्वाची आकडेवारी : एक नजर**

✻ सध्या चलनात असलेल्या एकूण नोटांचे मूल्य १७,५४,००० कोटी रुपये.

✻ पाचशे रुपयांच्या नोटांचे चलनातील प्रमाण – ४५ टक्के.

✻ एक हजार रुपयांच्या नोटांचे चलनातील प्रमाण – ३९ टक्के.

✻ शंभर व दहा रुपयांच्या नोटांचे चलनातील प्रमाण – ५३ टक्के.

✻ ८ नोव्हेंबर २०१६ मध्यरात्रीपासून चलनातून बाद होणाऱ्या नोटांचे मूल्य ६,३२,६०० कोटी रुपये.

✻ रिझर्व्ह बँकेने १९५४ मध्ये सर्वप्रथम एक हजार रुपयाची नोट बाजारात आणली.

✻ तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी १९७८ मध्ये एक हजार, पाच हजार व दहा हजारांच्या नोटांवर बंदी घातली होती.

✻ देशातील एटीएमची संख्या दोन लाख वीस हजार.

✻ देशात ३७० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व त्यांच्या १४ हजारांहून अधिक शाखा.

✻ महाराष्ट्रात ३१ जिल्हा बँका व त्यांच्या ३७४६ शाखा.

✻ नव्या नोटा छापण्याचा खर्च अंदाजे १५ ते ३० हजार कोटी रुपये.

✻ ५०० व १००० रुपयांच्या नोटांची एकंदर किंमत १३ लाख कोटी रुपये.

✻ रिझर्व्ह बँकेचे दोन छपाई कारखाने, नाशिक रोड, म्हैसूर येथे.

✻ एक नोट छापण्याचा खर्च सुमारे तीन रुपये.

➤ पान क्र. १ वरून ...

## अध्यक्षांचे लेखणीतून

वाढ झालेली दिसते. ठेवतारण कर्जे आणि सोनेतारण कर्जे हे देखील याला अपवाद नाहीत. नूतनीकरण न झालेली कॅश क्रेडिट खाती तुलनेने अधिक आहेत. या खात्यांच्या नूतनीकरणासाठी शाखा व्यवस्थापकांनी स्वतः लक्ष घालून लवकरात लवकर ही खाती नियमित करून घ्यावीत. थकित कर्जखात्यांचे कर्मचाऱ्यांमध्ये वाटप करून द्यावे आणि दर आठवड्याला शाखास्तरावर वसुलीचा आढावा घेतला जावा. काही विशेष खात्यांत प्रसंगी कठोर निर्णय घेऊन त्यांना नियमित करावे लागेल. यासाठी आवश्यकता वाटल्यास शाखांनी मुख्य कार्यालयाची मदत घ्यावी. गतवर्षी डिसेंबर अखेरदेखील थकित कर्जांची साधारण हीच परिस्थिती होती. पण पुढील तीन महिने कठोर परिश्रम करून आपण थकित कर्जाचे प्रमाण नियंत्रणात आणले होते. असेच परिश्रम या वेळीही आपण करू आणि थकित कर्जाचे प्रमाण कमीतकमी राखू याबद्दल मला विश्वास आहे. बँकिंगमध्ये वेगाने घडणाऱ्या घटनांच्या रणधुमाळीत ग्राहकांकडे दुर्लक्ष होता कामा नये. चलनाच्या तुटवड्यामुळे सर्वसाधारण ग्राहक अस्वस्थ आहे. त्याला जपा. त्याला त्याचे व्यवहार सुरळीत करता येतील यासाठी प्रयत्न करा. उत्कृष्ट ग्राहक सेवा ही आपली परंपरा आहे. अधिक तत्पर ग्राहकसेवेसाठी आपली सदुसष्टावी आणि पुणे शहरातील बाविसावी हडपसर शाखा दिनांक अठरा ऑक्टोबर रोजी कार्यरत झाली आहे. आर्थिक वर्षाच्या समाप्तीसाठी जेमतेम तीन महिन्यांचा कालावधी आपणास उपलब्ध आहे. पुन्हा एकदा आपण सारे मिळून वर्षअखेरच्या उज्ज्वल कामगिरीसाठी एकजुटीने प्रयत्न करू या. परमेश्वर आपणास यशस्वी करील याचा मला विश्वास आहे. सर्व कर्मचारी, सभासद, संचालक, ग्राहक आणि बँकेच्या शुभचिंतकांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

### विचारधन



शेती, उद्योग, पणन, बँकिंग या सगळ्याच क्षेत्रांत सहकारामुळे कष्टकरी वर्गाला प्रवेश सुखद झाला. महाराष्ट्रातील सहकाराची उलाढाल पाहता ही चळवळ पुढे अशीच चालू राहावी.

**– पद्मभूषण वसंतदादा पाटील**

**सुदृढ भारताच्या भवितव्यासाठी डिजिटल पेमेंट आणि कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन द्या.**

✻✻✻✻✻✻✻

**सर्व वाचकांना गरुड झेप परिवारातर्फे नाताळ आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# भारतीय रिझर्व्ह बँकेची परिपत्रके

**⁕ परिपत्रक क्र. आरबीआय/१७/२०१५–१६ (एफईडी) दि. १/०१/२०१६**

**विषय :– विदेश विनिमय व्यवहाराविषयी सविस्तर मार्गदर्शक सूचना**

फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट १९९९ अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँक विविध व्यक्ती अथवा संस्थांना विदेश विनिमयाचे अधिकार प्रदान करते. त्यानुसार ॲथोराईज्ड मनी चेंजर्स तसेच ॲथोराईज्ड डिलर्स कॅटॅगरी १ आणि २ ची नियुक्ती केली जाते. ॲथोराईज्ड मनी चेंजर्स आणि ॲथोराईज्ड डिलर्स कॅटॅगरी २ यांना विदेश विनिमय व्यवहारासाठी निवासी अथवा अनिवासी फ्रान्चाईजी नियुक्त करण्याचा देखील अधिकार आहे. या संस्थांना फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट १९९९ च्या कलम ११ अंतर्गत सर्व अटी आणि शर्तीचे पालन करणे बंधनकारक असते.

भारतीय रिझर्व्ह बँकेने अधिकृत मनी चेंजर्स तसेच अधिकृत डिलर्स कॅटेगरी २ तसेच त्यांनी नियुक्त केलेल्या फ्रान्चाईजना फ्रान्चाईजचे अधिकार देणे. विदेश विनियम व्यवहार याबद्दल सविस्तर नवीन मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. या सूचनांची एक प्रत या परिपत्रकासोबत जोडली आहे. बँकांनी विदेश विनियम व्यवहाराविषयी हे बदल आचरणात आणावेत.

**⁕परिपत्रकक्र. आरबीआय/२९७/२०१५–१६ (एफईडी) दि. २१/०१/२०१६**

**विषय :– नॅशनल कॅलेंडर (शके संवत) नुसार तारीख लिहिलेले धनादेश स्वीकारण्याविषयी**

दि. २२/०३/१९५७ रोजी केंद्र सरकारने परिपत्रक काढून सर्व संस्थांना ग्रेगोरियन कॅलेंडर सोबत नॅशनल कॅलेंडर (शके संवत) नुसार तारीख लिहिलेले दस्तऐवज ग्राह्य मानण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याला अनुसरून भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्व सहकारी बँकांना शके संवतनुसार तारीख लिहिलेले धनादेश स्वीकारण्याविषयी सूचना दिल्या आहेत. धनादेशाचे भुगतान करताना शके संवतनुसार लिहिलेली तारीख ग्रगोरियन कॅलेंडरशी जुळवून घ्यावी. जेणेकरून मुदत बाह्य धनादेशाचे भुगतान आपणाकडून होणार नाही.

**⁕परिपत्रकक्र. आरबीआय/३०६/२०१५–१६ दि. ४/०२/२०१६**

**विषय :– सभासद तसेच ग्राहकासाठी**

**आरटीजीएसच्या सेवादरातील बदल**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. १/१०/२०११ रोजी परिपत्रकाद्वारे आरटीजीएस व्यवहारात सहभागी बँकांना आरटीजीएसच्या बाह्य (Outward) व्यवहारांसाठी सेवादर लागू केले होते. त्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने ही सेवा अद्ययावत तसेच सक्षम करण्यासाठी मोठी रक्कम खर्च केली आहे आणि म्हणूनच त्यांनी सभासद ग्राहकांच्या सेवादरात खालीलप्रमाणे बदल केले आहेत. इनवर्ड व्यवहार मात्र पूर्वीप्रमाणेच नि:शुल्क असतील.

**मासिक सभासद फी :–** भारतीय रिजर्व बँकेने सभासदांच्या मासिक फीमध्ये वाढ केली आहे. दि. १/०४/२०१६ पासून सुधारित मासिक फीचे दर खालीलप्रमाणे असतील.

| संस्था | मासिक सभासद फी (सर्व्हिस टॅक्स व्यतिरिक्त) |
|---|---|
| शेड्यूल्ड कमर्शिअल बँका | रु. ५,०००/– |
| शेड्यूल्ड कमर्शिअल बँका सोडून इतर बँका, प्रायमरी डिलर्स, क्लिअरिंग संस्था आणि इतर संस्था | रु. २,५००/– |

**खातेव्यवहार प्रोसेसिंगचा दर –** प्रत्येक बाह्य व्यवहारावर (Outward Transaction) सरसकट पहिल्या कॅपसाठी रु. ०.५० (सर्व्हिस टॅक्स सोडून) एवढी प्रोसेसिंग फी आणि खालीलप्रमाणे टाईम व्हॅरिंग चार्ज आकारला जाईल.

| अ. क्र. | रिझर्व्ह बँकेच्या सेटलमेंटच्या वेळा | | टाईम व्हॅरिंग चार्जेस (फ्लॅट प्रोसेसिंग चार्ज व सर्व्हिस टॅक्स सोडून) |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| १ | ८.०० | ११.०० | शून्य |
| २ | ११.० | १३.०० | रु. २.०० |
| ३ | १३.०० | १६.३० | रु. ५.०० |
| ४ | १६.३० | –– | रु. १०.०० |

कमीत कमी अथवा जास्तीत जास्त टाईम व्हॅरिंग दरात बदल होत नसल्यामुळे, सभासदांनी ग्राहकांकडून वसूल करावयाच्या जास्तीत जास्त फी मध्ये देखील बदल सुचविलेले नाहीत. हे दर खालीलप्रमाणेच राहतील.

| | |
|---|---|
| आरटीजीएस व्यवहार | मोफत |
| इनवर्ड ट्रॅन्झॅक्शन | मोफत |
| आऊटवर्ड ट्रॅन्झॅक्शन | |
| रु. २.०० लाख ते रु. ५.०० लाख | रु. २५ + टाईम व्हॅरिंग दर (जास्तीत जास्त रु.३०) |
| रु. ५.०० लाख पेक्षा अधिक | रु. ५० + टाईम व्हॅरिंग दर (जास्तीत जास्त रु.५५) |

भारतीय रिझर्व्ह बँक, बँकांच्या आरटीजीएससाठीचे एकत्रित मासिक सेवाशुल्क त्यांचे रिझर्व्ह बँकेतील खात्यातून वसूल करील. रिझर्व्ह बँकेने वसूल केलेल्या सेवाशुल्काविषयी सविस्तर माहिती डिपॉझिट अकाउंट विभागाकडून प्राप्त केलेल्या स्टेटमेंटद्वारा बँकांना उपलब्ध करून घेता येईल.

**क्रमशः ...**

## वाचकांना नम्र आवाहन

गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा.

**पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.**

**मो. क्र. : ९९६०१२३३३१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ⁕ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.

**दूरध्वनी : ०२०–२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)**

२७.१२.२०१६